# ग्रामविकासाची नवी दृष्टी मिळाली...

टीम अॅग्रोवन

**सरपंच हा गावाचा प्रमुख असून, त्याला योग्य दिशा मिळाल्यास संपूर्ण गावाच्या विकासाला चालना मिळणार आहे. अशीच ग्रामविकासाची नवी दृष्टी या सरपंच महापरिषदेतून मिळत असल्याची भावना राज्यभरातून आलेल्या सरपंचांनी व्यक्त केली.**



### नवी ऊर्जा मिळाली

ग्रामविकासाच्या विविध मुद्द्यावर चर्चा झाली, आमच्यासाठी ती खूपच महत्त्वाची ठरली. सरपंचांच्या अधिकार आणि कर्तव्याची जाणीव आम्हाला त्यातून मिळाली. शेती, ग्रामविकासाला चालना देणाऱ्या या परिषदेतून आम्हाला नवी ऊर्जा आणि प्रेरणा मिळाली. अॅग्रोवनच्या या उपक्रमाचे कौतुक करावे तेवढे थोडेच आहे.

-**सुनील साबळे,** लहान आर्वी, ता. आष्टी, जि. वर्धा



### विचारांची देवाणघेवाण झाली

सरपंचांना काम करताना गावपातळीवर येणाऱ्या अडचणी कशा असू शकतात, त्या सोडवण्यासाठी कसे प्रयत्न करायला हवेत, याची माहिती मिळाली. पायाभूत सुविधांपासून आरोग्य, शिक्षण, कृषीपूरक उद्योगांची नवी माहिती या माध्यमातून मिळाली. सरपंचांनाही एकमेकांच्या विचारांची देवाण-घेवाण करणे सोपे झाले.

- **संदीप देशमुख,** पिलापूर-येनाडा, ता. आष्टी, जि. वर्धा



### हे प्रोत्साहन उपयुक्त ठरेल

ग्रामविकासाच्या अनुषंगाने बरीच माहिती मिळाली. विशेषतः आमदार, खासदार निधीतून करावयाच्या कामाबाबत आवश्यक मार्गदर्शन झाले. आमच्यापर्यंत अद्याप न पोचलेल्या अनेक योजनांची माहिती समजली. अॅग्रोवन सरपंच परिषदेमुळे नवी ऊर्जा आणि प्रोत्साहन मिळाले असून, कामाचा हुरुप वाढला आहे.

-**सौ. पूर्वा भारत वाघमारे,** हिरज, ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर



### शेतीकेंद्रित ग्रामविकासाचे महत्त्व समजले

ग्रामीण भागात शेती हा विषय केंद्रस्थानी असतो. त्या अनुषंगाने शेतीच्या विकासातून गावाचा चांगल्या प्रकारे विकास साधता येतो. अशा अनेक योजना समजल्या. तज्ज्ञांचे अनुभवही खूपच प्रेरणादायी आणि आमचा उत्साह वाढवणारे राहिले. गावांच्या नेमक्या गरजा जाणून विशेषतः आरोग्य सुविधांबाबत काम करण्याची आवश्यकता मुख्यमंत्र्यांच्या भाषणातून जाणवली.

- **सौ. अश्विनी बाबासाहेब पांढरे,** बाणेगाव, ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर



### भविष्यातील कामासाठी प्रेरक

पहिल्यांदाच थेट सरपंच म्हणून निवडून आले. या सरपंच महापरिषदेत प्रथमच सहभागाची संधी मिळाली. सरपंच गावाचा विकास काय आणि कशा पद्धतीने करू शकतो, याची सर्वंकष माहिती यातून झाली. अॅग्रोवनने आम्हाला हे व्यासपीठ मिळवून दिल्याबद्दल आभारी आहे. हे व्यासपीठ भविष्यातील कामांसाठी नक्कीच प्रेरक ठरेल.

- **सौ. कौशल्या विनायक सुतार,** कारंबा, ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर



### शेतकरी कंपन्या ग्रामविकासात महत्त्वाच्या

आम्हाला गावच्या विकासासाठी मौलिक माहिती आणि मार्गदर्शन महापरिषदेतून मिळाली. सरपंचांच्या अधिकाराची जाणीव झाली असून, त्याचा फायदा भविष्यामध्ये होईल. जलयुक्त शिवार योजनेची गरज, शेतकरी कंपन्यांची गावाच्या विकासातील महत्त्वाची भूमिकाही त्यातून पुढे आली. या विषयावर आम्ही आमच्या गावात नक्कीच काम करू.

-**भास्कर वाढे,** संगोदा, ता. शेगाव, जि. बुलडाणा



### गावाला आघाडीवर नेण्यासाठी उपयुक्त

ग्रामविकास हा खऱ्या अर्थाने शेतीशी जोडलेला विषय आहे. आजच्या महापरिषदेच्या निमित्ताने आम्हाला ग्रामविकास आणि कृषी केंद्रित अनेक विषय समोर आले. त्यावर काम करत गावाला आघाडीवर नेण्याचा विचार आहे. शासनाच्या विविध योजनांची माहितीही या माध्यमातून मिळाली.

- **अनंता शेळके,** बोंडगाव, ता. शेगाव, जि. बुलडाणा.



### तज्ज्ञांच्या अनुभवाचा फायदा मिळाला

विविध तज्ज्ञांच्या विचारातून आम्हाला नवी ऊर्जा आणि प्रोत्साहन मिळाले आहे. खूप काही शिकून आम्ही या परिषदेतून पुढे जाणार आहोत. आरोग्य, शिक्षण, शेतीपूरक उद्योग या सगळ्या अनुषंगाने उपयुक्त माहिती मिळाली. तज्ज्ञांच्या अनुभवाचाही आम्हाला फायदा झाला.

- **अर्चना केशवराव हिंगणे,** वरखेड, ता. शेगाव, जि. बुलडाणा.



### अनमोल मार्गदर्शन मिळाले

गावात विकासकामे करण्यासाठी आवश्यक योजनांची मला फारशी माहिती नाही. या सरपंच महापरिषदेतून नवीन योजनांच्या माहितीसोबत पोपटराव पवार यांच्यासारख्या ग्रामविकासामध्ये कार्यरत अनुभवी व्यक्तींचे अनमोल मार्गदर्शन मिळाले. यामुळे गावात कामे करण्यासाठी प्रोत्साहन मिळाले.

- **सुषमा रतन बिरानवार,** सरपंच, आजनी, ता. रामटेक, जि. नागपूर



### ग्रामविकासाला मिळेल चालना

सरपंचांना आपले कार्य, कर्तव्ये याविषयी नेमकी माहिती फारशी नसते. या महापरिषदेतून मिळालेल्या माहितीचा उपयोग गावाच्या विकासासाठी होऊ शकतो. गावातील नागरिकांशी चर्चा करून, शौचालयाचा वापर, शोषखड्डे, रस्ते या कामांवर भर देण्याचा विचार आहे. उत्तम कामातून गावाची एक वेगळी ओळख तयार करण्यासाठी मी प्रयत्नशील राहील.

- **विजयालक्ष्मी श्रीशैल व्हलमाने,** मद्रे, ता. दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर



### महिलांसंबंधी काम करण्याला प्राधान्य

गावात वर्षानुवर्षे कामे होत असली तरी महिलांना समोर ठेऊन झालेली कामे कमी आहेत. ग्रामपंचायतीच्या माध्यमातून महिलांसाठी रुग्णालय उभारणीवर भर देणार आहे. या परिषदेतून महिलांसंबंधीची अनेक योजनांची माहिती मिळाली. त्याचा फायदा गावात काम करताना होईल. गावात नेटवर्कची समस्याही सोडविण्यासाठी माझा प्रयत्न राहणार आहे.

- **प्रतिमा शेलार,** बोरवली, ता. मावळ, जि. पुणे



### सौरऊर्जेवर भर देण्याची इच्छा

गावात पूर्वी काही प्रमाणात विकासकामे झाली असली, तरी त्यामध्ये सुसूत्रता नाही. सरपंच महापरिषदेमध्ये मुख्यमंत्री, ग्रामविकासमंत्री आणि पोपटराव पवार यांचे पहिल्या दिवशी अनमोल मार्गदर्शन मिळाले. त्यानुसार ग्रामविकासाच्या कामांचे नियोजन करण्याचा विचार आहे. विशेषतः सौरऊर्जेवर अधिक भर देण्याची इच्छा आहे.

- **किशोर शिंदे,** वडू, ता. जि. सातारा,



### अनुभवांचे बोल उपयुक्त ठरतील

विकासासंबंधी शासकीय योजनांची माहिती समजली. त्याचप्रमाणे सरपंचाचे कार्य, कर्तव्ये याविषयी आम्ही जागरूक झालो. रस्ते, पाणीपुरवठा, शौचालयांचा वापर वाढविण्यासाठी प्रयत्न करणार आहे. गावात विकासाची कामे राबविण्यासाठी विविध अनुभवी वक्त्यांचे विचार उपयोगी ठरतील.

- **नीलम भरदाने,** हन्हाळी, ता. कागल, जि. कोल्हापूर.



### विकासाचा मार्ग दाखवणारी परिषद

आमच्यासारख्या गावच्या प्रमुखांना विकासाचा मार्ग दाखवणारी ही सरपंच महापरिषद ग्रामविकासालाही खऱ्या अर्थाने दिशा देणारी ठरेल. यातून शासनाच्या विविध योजनांची सविस्तर माहिती मिळाली. त्या योजना गावात राबवून गावाची ओळख आदर्श गाव म्हणून करण्याचा विचार आहे.

- **बसवराज तनवडे,** शिरवळ, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर.



### विविध योजना समजल्या

सरपंच महापरिषदेत सहभागी होण्यासाठी मी खूप इच्छुक होतो. या महापरिषदेतून मुख्यमंत्र्यांनी ज्या आरोग्य, पाणीपुरवठा, जलयुक्त शिवार, शेतीसंबंधी योजना सांगितल्या आहेत. या सर्व मुद्द्यांवर काम करण्याचा मानस आहे. त्यातून गावामध्ये विकासाची गंगा आल्याशिवाय राहणार नाही.

- **उत्तम लोखंडे,** रांजणगाव सांडस, ता. शिरूर, जि पुणे.



### विकासाबाबत जागरूक झालो

गावाच्या विकासासाठी आवश्यक त्या सर्व बाबींची माहिती या सरपंच महापरिषदेतून मिळत आहे. गावात विकासाची कामे सुरू आहेतच, त्यात या परिषदेमुळे अधिक डोळसपणा नक्कीच येणार आहे. गावातील रस्ते, पाणी, महिला, शिक्षण यासंबंधी प्रश्न सोडविण्यावर माझा भर असेल.

- **शिवाजी थोरात,** खुटबाव, ता. दौंड, जि. पुणे.

### सरपंच म्हणून आत्मविश्वास मिळाला

मी पहिल्यांदाच सरपंच झाले असल्याने योजनांची फारशी माहिती नाही. गावाचा विकास करण्यासाठी आवश्यक तो आत्मविश्वास या परिषदेतून मी घेऊन जात आहे. गावामध्ये विविध योजना कशाप्रकारे राबवता येतील, याविषयी गावकरी व महिलांसोबत चर्चा करून निर्णय घेणार आहे.

- **ज्योती गावडे,** गावडेवाडी, ता. दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर


## "निविदा जाहिरात"

**जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे १**
**(पुरवठा शाखा) दुसरा मजला, जुनी जिल्हा परिषद, यशवंतराव चव्हाण भवन, पुणे १, दूरध्वनी : २६०६१०१३. E-mail : dsopune@gmail.com**

**क्र. पसस/१५/गोदाम/कावि/९६/२०१८** — **पुणे दि. ९-२-२०१८**

**पुणे जिल्ह्यातील शासकीय गोदामातील धान्यावर फवारणी करण्याकरिता कीटकनाशके औषधे खरेदी करण्याबाबत. (सन २०१८)**

जिल्हाधिकारी पुणे यांच्याकडून पुणे जिल्ह्यातील १३ तालुक्यांतील शासकीय गोदामातील धान्यास कीड लागून खराब होऊ नये याकरिता धान्यावर कीटक नाशक औषध न्युवॉन व मॅलिथिऑन फवारणी करणे कामी औषध खरेदीसाठी दि. २४-०१-२०१८ ते ०७-०२-२०१८ या कालावधीमध्ये दर मागविण्यात आले होते; परंतु सदर कालावधीत निविदेस अल्प प्रतिसाद मिळाल्याने सदर निविदेस पुढील ८ दिवसांची अल्प मुदतवाढ देण्यात येत आहे. ज्या गरजूंना निविदा भरण्याची आहे, त्यांनी जिल्हा पुरवठा अधिकारी, पुणे यांच्या कार्यालयात वरील नमूद औषधांचे दर सादर करावे.

**निविदाप्रक्रिया खालील वेळापत्रकाप्रमाणे राबविण्यात येणार आहे.**

| अ. क्र. | कार्यवाहीचा टप्पा | | कार्यवाही पूर्ण करण्याकरिता शेवटचा दिनांक |
|---|---|---|---|
| १. | निविदा प्रसिद्ध करणे | | **दिनांक १४-२-२०१८** |
| | अ. | ई-निविदेची सर्व प्रक्रिया राबविणे | **दिनांक १४-२-२०१८ ते २१-२-२०१८** |
| | ब | निविदा सादर करण्याचा अंतिम दिनांक | **दिनांक २१-२-२०१८ (दुपारी १२.०० वाजेपर्यंत)** |
| | क | निविदा उघडणे | **दिनांक २२-२-२०१८ (दुपारी १२.०० वा.)** |

सदर ई-निविदा जाहिरात सविस्तरपणे दैनिक वृत्तपत्रामध्ये **दिनांक १४-२-२०१८ पासून** प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. तसेच सदर निविदा **१४-२-२०१८ ते २१-२-२०१८ पर्यंत** कार्यालयीन वेळेत कार्यालयात पाहावयास मिळतील.

**सही/-**
**जिल्हाधिकारी, पुणे**

**विमाका-पुणे-जाहि-१०८५-२०१७-१८**